بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ     نَحْمَدُہٗ وَ نُصَلِّیْ عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْمِ     وَعَلٰی عَبْدِہِ الْمَسِیْحِ الْمَوْعُوْد
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)    Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in

# बदर युद्धबाबतीत पवित्र पैगंबर (स.) यांचे ऐतिहासिक व श्रद्धावर्धक प्रसंगवर्णन

सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा दि. १०-११-२०२३ स्थान मशिद मुबारक टिलफर्ड, लंडन

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ ۙ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहा च्या पठणानंतर, हुजूर अनवर म्हणाले: मी, बदर युद्धानंतरच्या काळात पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनाचा उल्लेख करत होतो. या संदर्भात दोन हिजरीतील घटनांमध्ये 'जन्नतुलबक़ी'च्या स्थापनेचा उल्लेख आढळतो. स्पष्टीकरण असे आहे की मदिनामध्ये ज्यू आणि इतर जमाअतींची स्वतःची स्मशानभूमी होती. अल्लाहचे पैगंबर मदिना येथे पोहोचले तेव्हा मुस्लिमांसाठी स्वतंत्र कब्रस्तानची गरज भासू लागली. त्यामुळे मुस्लिमांसाठी 'बक़ी अलगरकादची' स्मशानभूमी निवडण्यात आली. अरबीमध्ये 'बक़ी'चा अर्थ अशी जागा आहे जिथे खूप झाडे आहेत,असा होतो. या स्मशानभूमीला 'जन्नतुलबक़ी' असेही म्हणतात.

हजरत मिर्झा बशीर अहमद साहिब (र.ज.) सांगतात की २ हिजरी मध्ये पवित्र पैगंबर (स.) यांनी मुस्लिमांसाठी एक कब्रस्तान निवडला, ज्याला 'जन्नतुलबक़ी' म्हणतात. यामध्ये सर्वप्रथम दफन होणारी व्यक्ति

हजरत उस्मान बिन माझून होते. ते अत्यंत धर्मपरायण आणि सद्वर्तनीय व्यक्ति होते. मुस्लिम झाल्यानंतर त्यांनी एकदा पवित्र प्रेषित (स.) कडे जगाचा पूर्णपणे त्याग करून आणि पारिवारीक जबाबदाऱ्या सोडून पूर्णपणे देवापायी राहण्याची परवानगी मागितली. यावर पैगंबर म्हणालेः परमेश्वराचा हक्क परमेश्वराला द्या, आणि घरंच्याचा हक्क त्यांना द्या. पाहुण्यांचा हक्क पाहुण्यांना द्या आणि स्वतःचा हक्क स्वतःला द्या, कारण हे सर्व अधिकार परमेश्वराने दिलेले आहेत आणि त्यांचे हक्क प्रदान करणे हे उपासनेत समाविष्ट आहे. म्हणजेच हक्कांची पूर्ती हाही उपासनेचा भाग आहे. या कारणास्तव, त्यांनी उस्मान बिन माझून यांना ऐहिक जीवन त्याग करण्याची परवानगी दिली नाही आणि सांसारिक त्याग आणि मठवाद इस्लाममध्ये अनुज्ञेय असल्याचे घोषित करून, त्यांनी आपल्या उम्मासाठी एक मध्यम मार्ग स्थापित केला. उस्मान बिन माझूनचा मृत्यू पवित्र प्रेषित (स.) साठी खूप धक्कादायक होता आणि असे वर्णन आहे की त्यांच्या मृत्यूनंतर त्यांनी त्यांच्या कपाळाचे चुंबन घेतले आणि त्यावेळी त्यांचे डोळे ओले होते.

हुजूर अनवर म्हणालेः आता मी बनी गत्फानच्या युद्धाचा उल्लेख करतो. पैगंबर (स) यांना अशी माहिती मिळाली की गत्फानची शाखा बनी सालबा आणि बनू मुहारीब मुस्लिमांच्या विरोधात एका ठिकाणी एकत्र येत आहेत. या बातमीनंतर पवित्र पैगंबर आपलया सह ४५० साथीदारांना घेऊन निघाले. ३ हिजरी रबीउल अव्वल महिन्यात हा युद्ध सुरू झाला. जेव्हा पवित्र प्रेषित (स.) श्रद्धाहीनांच्या विरोधात निघाले, तेव्हा वाटेत, त्यांना बनू गत्फानमधील एक व्यक्ती भेटला, ज्याला साथीदारांनी अटक केली आणि पवित्र पैगंबर (स.) यांच्याकडे हजर केले. त्यांनी पैगंबर (स) यांना त्यांच्या टोळीच्या हालचालीबद्दल माहिती दिली. प्रेषित (स.) यांनी त्यांना इस्लामचे आमंत्रण दिले, आणि त्याने ताबडतोब इस्लाम स्वीकारला. या व्यक्तीने पैगंबर (स.) यांना म्हणाले की जेव्हा त्यांच्या लोकांना हे कळेल की पैगंबर (स.) चे सैन्य आणि मुस्लिम त्यांच्या दिशेने येत आहेत, तेव्हा ते तुमच्याशी कधीही युद्ध करणार नाहीत, तर

आसपासच्या पर्वतांकडे पळ काढतील. म्हणून, जेव्हा मुसलमान त्यांच्या दिशेने पुढे सरकले, तेव्हा त्यांनी खरोखर लढाई केली नाही तर आजूबाजूच्या पर्वतांवर चढले. त्या प्रसंगी, प्रसिद्ध घटना घडली की जेव्हा पैगंबर (स.) झाडाच्या सावलीत विश्रांती घेत होते आणि सोबती कामात मग्न होते. एका व्यक्तीने त्यांच्यावर तलवार उपसली. या व्यक्तीने विचारले: हे मुहम्मद! आता तुला माझ्यापासून कोण वाचवेल? त्यांनी उत्तर दिले: अल्लाह! तेव्हा त्याच्या हातातून तलवार पडली.

या मोहिमेतील घटनांपैकी हजरत रुकय्या यांचे निधन आणि हजरत उम्म कुलसुम यांचा विवाह आहे. परंपरेनुसार पवित्र पैगंबर (स.) बदरला निघाले तेव्हा हजरत रुकय्या (र.ज.) आजारी होते, त्यामुळे त्यांनी हजरत उस्मान (र.ज.) यांना मदिना मध्येच राहण्याचे आदेश दिले. ज्या दिवशी हजरत जैद बिन हारिस बदरच्या विजयाची सुवार्ता घेऊन मदिना येथे आले त्या दिवशी हजरत रुकय्या यांचे निधन झाले. हजरत रुकय्या यांच्या मृत्यूनंतर, जेव्हा पवित्र प्रेषित (स.) हजरत उस्मान यांना भेटले तेव्हा ते म्हणाले, ‘‘उम्म कुलसुम (र.ज.)इतक्या हक्क मेहरसोबत अल्लाहने रुकय्याच्या विवाहासाठी आणि तिच्याशी तुमच्या चांगल्या वागणुकीसाठी आदेशित केले आहे.’’ लग्नाच्या तीन दिवसांनंतर, पवित्र पैगंबर (स.) उम्म कुलसुम (र.) यांच्याकडे आले आणि त्यांनी विचारले: हे माझ्या प्रिय मुली! तुला तुझा नवरा कसा वाटला? यावर उम्म कुलसुम म्हणाली की उस्मान हा सर्वोत्तम पती आहे. हजरत उम्म कुलसूम (र.ज) आजारी पडल्या आणि ९ हिजरी मध्ये मरण पावल्या. हजरत उम्म कुलसुम यांच्या मृत्यूनंतर, पवित्र पैगंबर म्हणाले की जर मला तिसरी मुलगी असती तर मी तिचे लग्न उस्मान यांच्याशी केले असते.

हजरत मिर्झा बशीर अहमद साहिब (र.ज) हजरत उम्म कुलसुम(र.ज) च्या विवाहाचा उल्लेख करताना म्हणतात की रुकया बिंत रसूलल्लाह हजरत उस्मान बिन अफान यांची पत्नी,च्या मृत्यूनंतर, पैगंबरांनी त्यांची दुसरी मुलगी, उम्म कुलसुम, जी फातिमापेक्षा मोठी होती, परंतु

रुकय्याहून लहान होती, हजरत उस्मान यांच्याशी विवाह केला. या कारणास्तव हजरत उस्मान यांना जुन्नुरैन उपाधी देण्यात आली, ज्याचा अर्थ दोन प्रकाश ग्रहण करणारा होतो. हजरत उम्म कुलसुम यांचा विवाह रबी अल-अव्वाल, ३ हिजरीमध्ये झाला होता. हजरत उम्म कुलसूम यांचा हा दुसरा विवाह होता. याआधी हजरत रुकय्या आणि हजरत उम्म कुलसुम यांचा विवाह पवित्र प्रेषितांचे काका अबू लहाबच्या दोन मुलांशी झाला होता, परंतु धार्मिक विरोधामुळे हे विवाह संपुष्टात आले.

या काळातील घटनांमध्ये गझवा बानू सलीमचाही उल्लेख आहे. प्रेषित (स) यांना सांगण्यात आले की मोठ्या संख्येने बनू सलीम मुस्लिमांच्या विरोधात जमा झाले आहेत. यावर, पवित्र प्रेषित (स.) यांनी अब्दुल्ला इब्न उम्मे मकतुम (र.ज.) यांना मदिना येथे आपला प्रभारी म्हणून नियुक्त केले आणि तीनशे साथीदारांसह सहा जमादीउल-अव्वाला गेले. दुसऱ्या परंपरेनुसार त्यांनी हजरत उमर यांना आपला नायब म्हणून नेमले. पैगंबर (स.)ला वाटेत बनी सुलेममधील एक व्यक्ती भेटले ज्याने त्यांना सांगितले की बनी सुलीम पांगले आहे. तपास केल्यावर या व्यक्तीची माहिती बरोबर असल्याचे सिद्ध झाले. म्हणून पैगंबर (स.) परत आले आणि युद्ध झाले नाही.

या मोहिम जैद बिन हारिसा आहे. त्याच्या वर्णनात असा उल्लेख आहे की एके दिवशी सफवान बिन उमय्याने आपल्या साथीदारांना सांगितले की, मुस्लिमांनी आमचे व्यापारी केंद्र सीरियाला जाणे बंद केले आहे. एका व्यक्तीने सुचवले की इराकपासून सीरियापर्यंत किनारी मार्ग ओलांडता येईल. म्हणून, मार्ग माहित असलेल्या एका व्यक्तीच्या मदतीने, सफवान बिन उमय्याने निघण्याचा निर्णय घेतला आणि ताफा तयार होऊ लागला. ही मोहिम जमादीउल आखिर ३ हिजरी मध्ये झाली. ही बातमी मदिनेतील लोकांपर्यंत पोहोचू नये यासाठी काफिल्यातील लोकांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. पण ईश्वराला काही वेगळेच मंजूर होते. म्हणून ही बातमी पैगंबरांपर्यंत पोहोचली. पैगंबर (स.) यांनी हजरत जैद बिन हारिसा यांच्या नेतृत्वाखाली

शंभर घोडेस्वार पाठवले. हजरत जैदची ही पहिली मोहिम होती ज्यामध्ये ते सनापती म्हणून रवाना झाला  आणि विजयी परतले.

हुजूर अनवर म्हणाले की, हे व्यापारी काफिले बंद करण्यात आले कारण या काफिल्यांचा नफा नंतर मुस्लिमांच्या विरोधात वापरला गेला. या काफिल्यांना थांबवणे म्हणजे आज विविध देशांवर आर्थिक निर्बंध लादल्यासारखे होते. आजकाल हे देश कधी कधी अतिरेक करूनही निर्बंध लादतात, मग कोणत्या प्रकारे ते इस्लामवर आळ घेऊ शकतात.

प्रवचनाच्या दुसऱ्या भागात हुजूर अनवर म्हणाले की, मी पॅलेस्टाईनसाठी पुन्हा प्रार्थना करण्याचे आवाहन करतो. आता निदान इतके झाले आहे की काही लोक हळू आवाज पण या दडपशाहीविरुद्ध बोलू लागले आहेत. उलट आता काही ज्यूंनीही या क्रौर्याविरुद्ध आवाज उठवला असून, ते आमचीही बदनामी का करत आहेत, असा सवाल त्यांच्या सरकारला केला आहे. तथापि, लोकांमध्ये आवाज उठू लागले आहेत. आता ते म्हणतात की युद्ध दररोज चार तास थांबवले पाहिजे जेणेकरून मदत पॅलेस्टिनींपर्यंत पोहोचू शकेल. उरलेल्या वीस तासात किती कारवाई केली जाईल आणि किती गोळीबारी केली जाईल अल्लाहलाच ठाऊक. अनेकदा मोठी सरकारे आणि राजकारणी पॅलेस्टिनींच्या जीवितहानीला महत्त्व देत नाहीत. त्यांचे स्वतःचे हितसंबंध आहेत. त्यांनी हे लक्षात ठेवावे की अल्लाह काही कालावधीसाठीच मुदत वाढवून देतो. मग हे जगच नाही तर पुढचे जगही आहे. तथापि, आपण अत्याचारित पॅलेस्टिनींसाठी खूप प्रार्थना केली पाहिजे. अल्लाह त्यांना या अत्याचारांपासून वाचवो. आमीन.

प्रवचनाच्या शेवटी, हुजूर अनवर यांनी दोन अंत्यसंस्कारांची घोषणा केली.

१.श्रीम. मन्सूरा बसमा साहिबा, हमीदुर रहमान खान साहिब यांच्या पत्नी, हजरत नवाब अब्दुल्ला खान साहिब आणि हजरत साहिबजादी उम्मे हाफीज बेगम साहिब यांची नात आणि हजरत साहिबजादा मिर्झा शरीफ अहमद साहिबा आणि हजरत बुजैनब बेगम साहिबा यांची नात. हे मियाँ अब्बास अहमद खान साहिब आणि उम्म अल बारी बेगम साहिब यांची मुलगी

होती. तिसरे खलिफा साहेब (र.ह) मसीह तिसरा, त्यांच्या लग्नाच्या प्रसंगी सल्ला देताना म्हणाले की, लग्नाच्या प्रसंगी पठण केलेल्या श्लोकांमध्ये, يَاَيُّهَا النَّاسُ اتَّقُوْا رَبَّكُمْ शब्दांसह رب’ ’परमेश्वर’ हा शब्द सदाचरण अंगीकारण्याचे उपदेश दिले आहे. हे तुम्हाला सांगण्यासाठी आहे की, ज्याप्रमाणे परमेश्वर तुमचे संगोपन करतो त्याचप्रमाणे तुमच्यावरही अशा जबाबदाऱ्या येणार आहेत की त्या पूर्ण करण्यासाठी तुम्हीही आत्म्याने ईश्वराची धार्मिकता अंगीकारणे आवश्यक आहे. ती अत्यंत कृतज्ञ, स्पष्ट बोलणारी, आणि श्रंद्धावंत, खलिफाची आज्ञापालन करणारी महिला होती. अल्लाह त्याना क्षमा आणि दया करो आणि त्यांच्या अपत्यांनामध्ये त्यांचे सद्गुण पुढे नेण्याचे सामर्थ्य प्रदान करो.

२. चौधरी रशीद अहमद, माजी रजिस्ट्रार, कृषी विद्यापीठ, फैसलाबाद. हुजूर अनवर, त्यांच्या गुणांचे वर्णन करताना म्हणाले, अल्लाह त्यांना क्षमा आणि दया देवो आणि त्यांच्या अपत्यांनामध्ये त्यांचे सद्गुण पुढे नेण्याचे सामर्थ्य प्रदान करो.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا

مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ۔ عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہ

اِنَّ اللّٰہَ یَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ

یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔